# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका
## लेखा व वित्त विभाग, मुख्य इमारत

Email-smkcacct.dept@gmail.com www.smkc.gov.in


जाहिर प्रकटन क्र.५/२०२५-२०२६

**कामांचे नांव :- सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे अधिकारी / कर्मचारी व मक्तेदारांच्या आयकर बाबतच्या पूर्ततेसाठी सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाकरीता आयकर सल्लागार यांची नियुक्ती करणेबाबत.**

सादर,

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या लेखा विभागामार्फत आयकर सल्लागार यांच्या कडून खालील नमुद केलेल्या कामगिरीसाठी दोन लिफाफा पध्दतीने वार्षिक दर मागविण्यात येत आहेत. त्याच्या शर्ती व अटी खालील प्रमाणे आहेत.

**करावयाची कामगिरी**

१. महानगरपालिकेचे अधिकारी/ कर्मचारी यांच्या मासिक वेतनातुन कपात होणाऱ्या आयकर रकमेची माहिती विहित नमुन्यात प्रती तिमाही आयकर विभागास पाठविणे.
२. महानगरपालिकेचे मक्तेदार, पुरवठादार, वकील, जागा भुसंपादन व इत्यादी यांचे देयकातुन कपात करणेत आलेल्या आयकर रकमेची माहिती विहित नमुन्यामध्ये प्रती तिमाही आयकर विभागास पाठविणे.
३. उपरोक्त कामांचे वर्ष अखेरीस प्रत्येकांचे स्वतंत्र फॉर्म नं.१६,१६A देणेत यावेत.
४. इतर अनुषंगिक कामे .

**अंदाजित रक्कम रुपये** :- २,००,०००/- (अधिक GST)

**लिफाफा क्र.१**

१.सनदी लेखापाल बाबतचे नोंदणी प्रमाणपत्र साक्षाकिंत प्रत

**लिफाफा क्र.२**

सांगली मिरज आणि कुपवाड महानगरपालिकेचे, कामिगिरीमध्ये नमूद आयकर विषयक पूर्तता करणेसाठी सन २०२५-२६ या वर्षासाठी वार्षिक फि र.रु.२,००,००० + GST

१. सदर कामाच्या निविदा लेखा विभाग मनपा येथे दि.२३/०५ /२०२५ ते ३० /०५/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यत स्विकारल्या जातील.
२. प्राप्त झालेल्या निविदा दिनांक ०२/०६/२०२५ रोजी निविदा समितीसमोर उघडल्या जातील.
३. सेवकांचे व मक्तेदारांचे आयकर बाबत काही त्रुटी किंवा दुरुस्ती असल्यास त्यांची पूर्तता वेळेत करण्याची सर्वस्वी जबाबदारी आयकर सल्लागार यांची राहिल व त्या कामांस कोणत्याही प्रकारची वेगळी फी आदा केली जाणार नाही.
४. कोणतीही निविदा स्विकारणे / नाकारणेचा अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.

(अभिजीत आ. मेंगडे)
मुख्य लेखाधिकारी
सांगली मिरज आणि कुपवाड शहर

कामाचे नाव — मनपाचे अधिकारी / कर्मचारी व मक्तेदार यांच्या आयकर बाबतच्या पुर्ततेसाठी सन 2025-2026 या आर्थिक वर्षाकरिता आयकर सल्लागार (C.A.) नियुक्त करणे.

## अटी व शर्ती

1. सदर कामगिरी मध्ये, सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेचे सन 2025-2026 वर्षातील अधिकारी /कर्मचारी यांच्या मासिक वेतनामधून कपात होणा-या आयकर बाबतची माहिती तसेच महानगरपालिकेचे मक्तेदार, वकील व अन्य इतर देयकामधून कपात करण्यात आलेल्या आयकर बाबतची माहिती प्रती तिमाही आयकर विभागास पाठविणे.
2. सेवकांचे व मक्तेदारांचे आयकर बाबत काही त्रुटी किंवा दुरूस्ती असल्यास त्यांची पुर्तता वेळेत करण्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील व त्यास कोणत्याही प्रकारची वेगळी फि दिली जाणार नाही.
3. आयकर बाबत इतर अनुषंगीक कामे वेळेत पूर्ण करण्याची जबाबदारी राहील.
4. सदर कामाचा किमान 2 वर्षाचा अनुभव असल्याचे अनुभव प्रमाणपत्र.
5. काम पूर्ण झाल्यानंतरच देयक अदा करणेची कार्यवाही करणेत येईल.
6. देयकामधून नियमा प्रमाणे आयकर, जीएसटी इ. शासकीय कराची कपात करण्यात येईल.
7. निधी उपलब्धतेनुसार देयक अदा करण्यात येईल. विलंब झाल्यास त्यावर कोणतेही व्याज अनुज्ञेय राहणार नाही.
8. याकामी कोणताही वाद उदभवलेस , त्याबाबत मा.आयुक्त, सां.मि.कु.मनपा यांचा निर्णय अंतिम राहिल.
9. मा.आयुक्त, मनपा यांनी वेळोवेळी दिलेले निर्देश बंधनकारक राहतील.

(अभिजीत मेंगडे)
मुख्यलेखाधिकारी

(शिरीष धनवे)
मुख्यलेखापरिक्षक

(रविकांत आडसूळ)
अति.आयुक्त